### एकाच वर्षात पर्यटन विभागाकडून सव्वा चार कोटींची खर्चवाढ

# जर्मनीतील उत्सवासाठी पाच कोटींचा प्रस्ताव!

**निशांत सरवणकर, मुंबई**

**जर्मनीतील कार्ल्सरुह** या छोट्या गावात होणाऱ्या उत्सवातून महाराष्ट्राच्या पर्यटनाला काहीही फायदा होत नसतानाही यंदा पर्यटन विभागाने या उत्सवावर पाच कोटींच्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे.

गेल्या वेळी या उत्सवासाठी फक्त ७० लाखांचा खर्च झाला होता. बर्लिन येथील आंतरराष्ट्रीय महोत्सवात सहभागी होण्यासाठी एक कोटीचा खर्च करणाऱ्या पर्यटन विभागाने या छोट्याशा उत्सवासाठी इतका भरमसाट खर्च प्रस्तावित केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

सारंगखेडा चेतक महोत्सवावर उधळण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांबाबत वित्त आणि नियोजन विभागाकडून आक्षेप घेण्यात आलेला असतानाही पर्यटन विभागाकडून पुन्हा भरमसाट खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रत्येक उपक्रमाचा खर्च हा कोटींच्या घरातच असावा, असा आग्रह धरतानाच एका खासगी व्यक्तीमार्फतच कंत्राट देण्याचा अट्टहास केला जात आहे.

२०१७ मध्ये सुरू झालेल्या कार्ल्सरुह येथील उत्सवासाठी यंदाही ७० लाखांच्याच खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु तो पाच कोटींपर्यंत असावा, असा आग्रह केला गेला आणि पर्यटन विभागाच्या संचालकांनी पाच कोटींचा प्रस्ताव सादर केला. परंतु हा प्रस्ताव सादर करताना गेल्या वर्षीइतकाच किंवा त्यापेक्षा दहा टक्के अधिक रक्कम योग्य असल्याचे मत व्यक्त करून पर्यटन संचालकांनी घरचा आहेर दिला आहे. हा प्रस्ताव पर्यटन विभागाच्या उपसचिवांकडे गेला तेव्हा त्यांनीही याच प्रकारचे मत मांडले. या उपसचिवांची तात्काळ बदली करण्यात आली.

या उत्सवासाठी पाच कोटींपेक्षा जास्त रकमेच्या खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आल्याची कागदपत्रे 'लोकसत्ता'कडे आहेत.

#### संचालकांचा विरोध!

या प्रस्तावाला पर्यटन विभागाचे संचालक दिलीप गावडे यांनीच विरोध केला आहे. कार्ल्सरुह गावाची लोकसंख्या तीन लाख आहे. या उत्सवाला तीन वर्षे झाली असून त्यात फक्त ३० हजार लोकांनी भेट दिली आहे. या छोट्या प्रमाणातील उत्सवावर अधिक खर्च करण्याची गरज नाही. त्यापेक्षा बर्लिनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय उत्सवात सहभागी झाल्यास त्याचा अधिक फायदा होईल. या आंतरराष्ट्रीय उत्सवात १८० हून अधिक देश सहभागी होतात. तब्बल एक लाख ६० हजार पर्यटक भेट देतात. अशावेळी रोडशो आणि सामंजस्य करार करण्यासाठी गेल्या वेळी झालेला ७० लाख किंवा त्यात आणखी दहा टक्के वाढ इतका खर्च करणे योग्य असल्याचे मतही त्यांनी नोंदविले आहे. मात्र, हे खरे नाही, असा दावा पर्यटन विभागाच्या सचिव विनिता सिंघल यांनी केला आहे. याबाबतचा प्रस्ताव पर्यटनमंत्री जयकुमार रावळ यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. याबाबत रावळ यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. लघुसंदेशालाही त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

## मीरा-भाईंदरला अतिरिक्त पाणीपुरवठ्याचे आदेश

**भाईंदर :** मीरा भाईंदर शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या ७५ दशलक्ष लिटर पाणी योजनेतील शिल्लक असलेले ३५ दशलक्ष लिटर पाणी मीरा भाईंदरला १० जुलैपासून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून तसे आदेश जलसंपदामंत्री गिरीश महाजन आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी मंगळवारी झालेल्या बैठकीत दिले आहेत.

मीरा-भाईंदर शहरातील पाण्याची निकड लक्षात घेऊन एमआयडीसीकडून ७५ दशलक्ष लिटर पाणी मंजूर करण्यात आले होते. परंतु बारवी धरणाची उंची वाढवल्यानंतरही विस्थापितांचा प्रश्न सुटला नसल्याने धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठविण्यात येत नव्हते. त्यामुळे ७५ दशलक्ष लिटरपैकी मीरा भाईंदरला ४० दशलक्ष लिटरच पाणी देण्यात येत होते. शासनाने विस्थापितांच्या प्रश्नावर निर्णय घेतला असून यावर्षीपासून बारवी धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शिल्लक ३५ दशलक्ष लिटर पाणी देण्यात यावे, अशी मागणी मीरा-भाईंदर पालिकेच्यावतीने सरकारकडे करण्यात आली होती.





सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन


सामाजिक न्याय विभाग




सामाजिक न्याय दिन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज

यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन...!




डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने

२६ जून - सामाजिक न्याय दिनानिमित्त विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा प्रातिनिधीक सत्कार सोहळा.

* सस्नेह निमंत्रण *

* कार्यक्रमाचे अध्यक्ष *

डॉ. सुरेश (भाऊ) खाडे
मा.मंत्री, सामाजिक न्याय

* प्रमुख उपस्थिती *

श्री. अरविंद सावंत — मा.मंत्री, अवजड उद्योग, भारत सरकार

श्री. सुभाष देसाई — मा.पालकमंत्री, मुंबई शहर

श्री. अविनाश महातेकर — मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

श्री. राज पुरोहित — मा.आमदार

श्री. विश्वनाथ महाडेश्वर — मा.महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका

राजर्षी छत्रपती शाहू जयंती व सामाजिक न्याय दिनानिमित्त विशेष व्याख्यान

वक्ते : श्री. राहुल सोलापूरकर, ज्येष्ठ सिनेअभिनेते

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, नरिमन पॉईंट, मुंबई येथे

बुधवार, दि. २६ जुन २०१९ रोजी सायंकाळी ४.३० वा.

वाटचाल - सामाजिक न्यायाच्या दिशेने

* वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनु. जातीच्या विद्यार्थांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतुन निर्वाह भत्ता.
* MAHA DBT प्रणालीद्वारे शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्याच्या खात्यात जमा होते.
* दिव्यांग व्यक्तिंना मोफत घरकुल व मोबाईल शॉप ऑन व्हेईकल उपलब्ध करुन देणार.
* संजय गांधी निराधार योजनेच्या मानधनात ६००/- रुपये वरुन रुपये १०००/- पर्यंत वाढ.
* १ अपत्य असणाऱ्या विधवा / परितक्त्या महिलेस रु. ११००/- आणि २ अपत्य असणाऱ्या महिलेस रु. १२००/- अनुदान.
* मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान.
* पम्द्श्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजने अर्तगत अनु.जाती व नवबौध्द घटकातील भूमीहिन शेतकऱ्यांना शेत जमीन घेण्यासाठी १०० % अनुदान.

डिजीआयपीआर /२०१९-२० /९२८


## दादरमध्ये दहा रुपयांसाठी भाजीविक्रेत्याकडून तरुणाची हत्या

**प्रतिनिधी, मुंबई**

**दहा रुपयांवरून** सुरू झालेल्या वादात भाजीविक्रेत्याने ग्राहकाची हत्या केल्याची घटना सोमवारी रात्री ११च्या सुमारास दादर रेल्वे स्थानकाबाहेर घडली. या प्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी सोनी महंतो (२५) या भाजी विक्रेत्याला अटक केली आहे. त्याला गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

मोहम्मद हनिफ अस्लम सिद्दीकी (३५) असे मृत तरुणाचे नाव आहे. शिवाजी पार्क पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साकिनाका येथे राहणारा सिद्दीकी पेशाने सुतार होता. काम आटोपून तो घरी निघाला होता. दादर स्थानकात भाजी घेण्यासाठी थांबला. घेतलेल्या भाजीचे पैसे त्याने आरोपी महंतोला दिले. मात्र सिद्दीकीने दिलेल्या दहा रुपयांच्या नोटेवरून दोघांमध्ये वाद सुरू झाला.

ही नोट बदलून दे, अशी मागणी महंतोने केली. तर नोट चांगली असून बदलून देणार नाही, अशी भूमिका सिद्दीकीने घेतली. त्यावरून वाद वाढला आणि महंतोने भाजी कापण्याच्या चाकूने सिद्दीकीवर वार केले. जखमी सिद्दीकीला केईएम रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी हत्येचा गुन्हा नोंदवून महंतोला अटक करण्यात आली.

स्थानिक भाजी विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महंतो अन्य विक्रेत्यांनी फेकलेली भाजी गोळा करून विकत असे. याआधीही त्याचे ग्राहकांशी, विक्रेत्यांशी किरकोळ कारणांवरून वाद झाले होते. त्याच्याविरोधात गुन्हे नोंद आहेत.

## जनावरांच्या अवैध वाहतुकीच्या अफवेमुळे बदलापुरमध्ये तणाव

**प्रतिनिधी, बदलापूर**

**जनावरांची अवैध** वाहतूक करून त्यांना कत्तलीसाठी आणले जात असल्याच्या अफवेमुळे बदलापूरमध्ये मंगळवारीही तणाव कायम होता.

या प्रकरणाबाबत तपास करण्यासाठी सोमवारी पोलिसांसोबत घटनास्थळी गेलेल्या प्राणिमित्रावर जमावाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी बदलापूर पश्चिम पोलिसांनी सात ते आठ अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहेत.

बदलापूर गावातील दफनभूमीजवळील एका जागेत काही जनावरे कत्तलीसाठी आणली जात असल्याची माहिती एका प्राणिमित्राला मिळाली होती. त्याची खातरजमा करण्यासाठी तो सोमवारी रात्री उशिरा बदलापूर पश्चिम पोलिसांना घेऊन घटनास्थळी गेला होता. त्या वेळेस तिथे दहा ते बारा जणांच्या जमावाने प्राणिमित्र चुकीची माहिती देत असल्याचा आरोप करीत त्याला मारहाण करण्याचा प्रयत्न केला. प्राणिमित्राने स्वरक्षणासाठी स्वतःच्या परवाना असलेल्या बंदुकीतून हवेत एक गोळी झाडली, अशी माहिती पोलिसांनी दिली. काही वेळानंतर पोलिसांनी जमावाला पिटाळून लावले.

प्राणिमित्राच्या माहितीनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. पाहणीनंतर तेथे काहीच आढळून आले नाही. त्या वेळी स्थानिक जमावाने प्राणिमित्राला मारहाण केली. मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली, असे परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त प्रमोदकुमार शेवाळे यांनी सांगितले.

### जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.

स्वप्नातील घराचा तुमचा मार्ग

(सीआयएन एल६५९२२एमएच१९८९पीएलसी०५४५८३)

नोंदणी. कार्या.: नॅशनल इन्श्युरन्स बिल्डिंग, ६ वा मजला, १४, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०००२०. ई-मेल: investors@gichf.com, corporate@gichf.com
दूर: २२८५ १७६५ (५ लाइन्स) फॅक्स: ०२२-२२८८४९८५/२२८८०१७३

**समभागधारकांना सूचना**

**समभागांचे इनव्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) कडे हस्तांतरण**

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १२४ आणि १२५ आणि वेळोवेळी फेरफार आलेल्या इनव्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरण नियमावली, २०१६ च्या नियम ६(३) च्या तरतुदींच्या मान्यतेच्या अनुषंगाने कंपनीच्या समभागधारकांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आईपीएफ नियमांच्या अनुषंगाने सर्व समभाग ज्यांच्या लाभांशाचा दावा किंवा प्रदान समभागधारकांना सलग गत सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळासाठी करण्यात आलेला नाही त्यांचे हस्तांतरणाच्या नियत दिनांकापासून ३० दिवसांनी आईपीएफच्या डिमॅट खात्यामध्ये करण्यात येईल.

आईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित समभागधारकांना ज्यांच्या लाभांशाची रकमेचे प्रदान/ दावा गत सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आलेले नाही त्याच्या तपशिलासह कंपनीने वैयक्तिकपणे पत्रव्यवहार केला आहे.

कंपनीने असे समभागधारक ज्यांच्या समभागांचे हस्तांतरण आईपीएफ नियमांच्या नियम ६(३)(ए) अनुसार करण्यात येणार आहे त्यांची यादी www.gichfindia.com या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

संबंधित समभागधारकांना याद्वारे विनंती करण्यात येत आहे की, वित्तीय वर्ष २०११-२०१२ पासून पुढच्या कालावधीसाठी लाभांशाचा दावा करण्यात आलेला नाही, त्यानी तो दावा २५ सप्टेंबर २०१९ पर्यंत किंवा त्यापूर्वी करावा. आणि जर असे न झाल्यास नियमांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने कंपनी वि. व. २०११-१२ पासूनच्या प्रदान न झालेल्या लाभांशाचे आणि संबंधित समभागांचे हस्तांतरण कोणतीही अतिरिक्त सूचना न देता आयईपीएफ प्राधिकरणाकडे करण्यात येईल.

आईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्यात आल्यानंतर, समभागधारकांना अशा लाभांश आणि त्यावर मिळणाऱ्या सर्व फायद्यासह समभागांचा दावा नियमांच्या अंतर्गत विहित करण्यात आलेल्या प्रक्रियेच्या अनुसार करता येईल . उपरोक्तच्या संदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित समभागधारक कंपनी किंवा त्यांच्या आरटीएशी संपर्क करू शकतात.

| | |
|---|---|
| **कंपनी सचिव**<br>नॅशनल इन्श्युरन्स बिल्डिंग, ६ वा मजला, १४,जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०००२०.<br>**दूर. क्र.: २२८५१७६५**<br>**ई-मेल: investors@gichf.com** | **श्री. अनिल दळवी, व्यवस्थापक**<br>**कार्व्ही फिनटेक प्रा. लि.**<br>कार्व्ही सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र. ३१-३२ गचीबोवली, फायनॅन्शियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद - ५०००३२ **दूर. क्र. ०४०-६७१६१६३१**<br>**ई-मेल: einward.ris@karvy.com** |

**जीआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता**

सही/-
एस. श्रीधरन
वरिष्ठ उपाध्यक्ष आणि कंपनी सचिव

दिनांक: २५.०६.२०१९
ठिकाण: मुंबई

### नवी मुंबई महानगरपालिका

**आरोग्य विभाग**

**निविदा सूचना क्र. - नमुंमपा/आरोग्य/47/2019 - (प्रथम मुदतवाढ)**

**कामाचे नांव :- नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयांकरीता रुग्णालयीन उपकरणे ENT and Ophthalmic Equipment's (ग्रुप-5) खरेदी करणेबाबत**

**कामाची अंदाजीत किंमत - रु. 2,43,35,892.00**

निविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in व www.nmmc.maharashtra.etenders.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**ऑनलाईन निविदा तयार करावयाची अंतिम दिनांक 02/07/2019. (सकाळी 11.00 वाजेपर्यंत)**

सही /-
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/275/2019

### Glenmark

PHARMACEUTICALS LIMITED

सी आय एन नं.: एल२४२९९एमएच१९७७पीएलसी०१९९८२
रजिस्टर्ड ऑफिस: बी/२, महालक्ष्मी चेम्बर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, महालक्ष्मी, मुंबई ४०० ०२६.
कॉर्पोरेट ऑफिस: ग्लेनमार्क हाऊस, बी. डी. सावंत मार्ग, चकाला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेसमोर, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९९.
फोन: ९१२२ ४०१८९९९९ फॅक्स: ९१२२ ४०१८९९८६
वेबसाइट: www.glenmarkpharma.com ई-मेल: complianceofficer@glenmarkpharma.com

## भागधारकांना सूचना

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आईपीएफ)कडे शेअर्सचे हस्तांतरण करण्याकरिता

**(कंपनी ॲक्ट, २०१३ चे कलम १२४(६) नुसार)**

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १२४(६) सहवाचता इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आईपीएफ) ऑथॉरिटी (अकाऊंटींग, ऑडिट ट्रान्सफर ॲण्ड रिफंड) च्या आवश्यकतांच्या संदर्भात कंपनीला जे क्रमवार सात वर्षे वा अधिक कालावधीकरिता प्रदान न केलेला वा दावारहित राहिलेल्या लाभांशा संबंधीचे शेअर्स केंद्र शासनाने स्थापन केलेल्या आईपीएफकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

ज्यांनी वित्तिय वर्ष २०११-१२ करताचा लाभांश आणि कंपनीने त्यानंतर घोषित आणि प्रदान केलेले नाहीत आणि जे सदर नियमांनुसार आईपीएफ खात्याकडे हस्तांतरित होण्यासाठी पात्र आहेत, अशा संबंधीत भागधारकांना कंपनीने वैयक्तिक पत्रव्यवहार पाठविला आहे.

ज्यांनी क्रमवार सात वर्षांकरिता त्यांचा लाभांश रोख केलेला नाही आणि त्यामुळे ज्यांचे शेअर्स आईपीएफकडे हस्तांतरित करण्याकरिता पात्र आहे अशा भागधारकांची यादी कंपनीची वेबसाईट : http://www.glenmarkpharma.com/investors/shareholders-corner यावर दाखविली आहे.

भागधारकांना, शेअर्स आणि दावा न केलेल्या लाभांशाच्या रकमेचा दावा करण्यासाठी कंपनीने रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट यांच्याकडे २ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यापूर्वी, सदर पत्रव्यवहारामध्ये नमूद करण्यात आलेली आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे. याद्वारे सूचना देण्यात येते की, भागधारकांद्वारा वैध दावा प्राप्त न झाल्यास, कंपनी सदर नियमांच्या आवश्यकतेनुसार पुढील कोणतीही सूचना न देता सदर शेअर्स आईपीएफकडे हस्तांतरित करील.

कृपया नोंद घ्यावी की, सदर नियमांनुसार आईपीएफ खात्याकडे हस्तांतरित करण्यात आलेली दावारहित लाभांशाची रक्कम आणि शेअर्सच्या बाबतीत कंपनीच्या विरोधात दावा करता येणार नाही. अशा हस्तांतरणावर, भागधारकांना हस्तांतरित झालेले शेअर्स यासह लाभांशाचा दावा आईपीएफद्वारा करता येईल, ज्याकरिताचा तपशील www.iepf.gov.in येथे उपलब्ध आहे.

या संबंधातील कोणत्याही माहिती/स्पष्टीकरणासाठी संबंधित भागधारकांना कंपनीकडे complianceofficer@glenmarkpharma.com येथे लिहिता येईल या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट मे. कार्व्ही फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड, कार्व्ही सेलेनिअम टॉवर बी, प्लॉट ३१/३२, गचिबोवली, फायनान्सीयल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैद्राबाद - ५०००३२ नि:शुल्क दुरध्वनी : १८००-३४५४-००१, ई-मेल : einward.ris@karvy.com वेब : www.karvy.com येथे संपर्क साधावा.

**ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडकरिता**

सही/-
**हरीश कुबेर**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**स्थान :** मुंबई
**दिनांक :** २५ जून, २०१९





लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

KESARI
World Class Travel Company
प्रस्तुत

लोकसत्ता viva Lounge

## चोखंदळ नायिका...

हिंदी चित्रपटसृष्टीत कुठलीही फिल्मी पार्श्वभूमी नसताना कारकिर्द घडवणे अवघड आहे का? केवळ आपल्या कलेच्या बळावर चोखंदळ भूमिकांमधूनच प्रेक्षकांसमोर येण्याचा हट्ट पूर्ण करणे अशक्य आहे? टेलीव्हिजनवर क्रांती घडवणारी 'शांति' सारखी मालिका, हिंदी चित्रपट आणि मराठीतही 'अस्तु', 'कासव', 'आपला मानूस' सारख्या चित्रपटांतील विविधांगी भूमिकांमधून आपला ठसा उमटवणारी चोखंदळ अभिनेत्री इरावती हर्षेच्या कारकिर्दीतच या प्रश्नांची उत्तरे दडलेली आहेत. भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेतलेल्या इरावतीच्या कारकिर्दीचे अनेक पैलू आहेत. अभिनयाबरोबर इतरही क्षेत्रात त्याच आत्मविश्वासाने आणि ठोस विचारांनी वावरणाऱ्या इरावतीशी गप्पा मारण्याची संधी 'लोकसत्ता'च्या 'व्हिवा लाऊंज' या उपक्रमातून मिळणार आहे...

**दिनांक:** बुधवार, २६ जून, २०१९, **वेळ:** सायं ४.४५ वाजता
**स्थळ:** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, शिवाजी पार्क, एस. व्ही. एस. रोड, दादर - पश्चिम, मुंबई.
प्रथम येणाऱ्यास प्राधान्य. काही जागा निमंत्रितांसाठी राखीव.
**प्रवेश विनामूल्य.**
अधिक माहितीसाठी संपर्क : ०२२ ६७४४ ०३४७, ६७४४०३६९.

*प्रवेशाचे हक्क स्वाधीन. व्हिवा पुरवणी निवडक शहरांत उपलब्ध.

*'व्हिवा लाउन्ज' मधील संवादात सामील व्हा. लाइव्ह व एक्स्क्लुझिव्ह. | www.loksatta.com | #LSVivaLounge